यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक
(YCMOU)

ज्ञानगंगा घरोघरी

YASHWANTRAO CHAVAN
MAHARASHTRA OPEN

अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

विभाग : शिक्षणशास्त्र विद्याशाखा अंतर्गत दिव्यांग अध्ययन केंद्र

जा. क्र. : नोंदणी/२०२६/५७०

दि : २९.०७.२०२६

सूचना पत्र क्र. – ४ / २०२६-२९

महत्वाची सूचना

बी. एड. विशेष शिक्षण (P-21) शिक्षणक्रमाच्या सन **२०२६-२९** या तुकडीसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरणाऱ्या सर्व अर्जदारांनी विद्यापीठाच्या मुख्यालयात येऊन कागदपत्र पडताळणी आणि प्रवेश पूर्व चाचणी देण्यासाठी उपस्थित राहणे आवश्यक आहे. याबाबतचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर दिली जाईल.

१. कागदपत्र पडताळणीसाठी खालील मूळ कागदपत्रासहीत संबधित कागदपत्राची झेरॉक्स १ प्रत सोबत घेवून स्वतः अर्जदार उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

कागदपत्रांची यादी खालीलप्रमाणे :-

१. ऑनलाईन भरलेल्या प्रवेश अर्जाची एक प्रत.
२. User ID आणि Password अर्जदाराने सोबत ठेवणे गरजेचे आहे.
३. जन्म तारखेचा पुरावा / शाळा सोडल्याचा दाखला / आधार कार्ड.
४. पदवीचे तिन्ही वर्षाचे गुणपत्रक आणि पदवी प्रमाणपत्र.
५. अर्जात पदव्युत्तर पदवीचे गुण भरले असल्यास दोन्ही वर्षाचे गुणपत्रक आणि प्रमाणपत्र.
६. विशेष शिक्षणातील RCI मान्य पदविका (Diploma Vocational Rehabilitation (DVR)/ Diploma in Special Education / B.Ed in Special Education संबधित माहिती अर्जात भरली असल्यास, संबधित गुणपत्रक व RCI प्रमाणपत्र.
७. य.च.म.मुक्त विद्यापीठातून पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी, पी.एच.डी, पूर्ण केल्याचे नमूद केले असल्यास संबधित मूळ गुणपत्रक व प्रमाणपत्र.
८. अर्ज अनु. जाती (SC) प्रवर्गातून अर्ज मधून सादर केला असल्यास जात प्रमाणपत्र आवश्यक.
९. अर्ज अनु. जमाती (ST) प्रवर्गामधून सादर केला असल्यास जात प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्र आवश्यक.
१०. VJ/NT/OBC/SBC आणि EWS, SEBC प्रवर्गामधून अर्ज सादर केला, असल्यास ना सायस्तर दाखला. (Non Creamy Layer Certificate **१ एप्रिल २०२६** नंतरचे असणे आवश्यक आहे.)
११. EWS/SEBC/ ट्रान्सजेन्डर यांनी दिलेले सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.
१२. अर्जदार स्वतः दिव्यांग असल्यास जिल्हा शल्य चिकित्सकाचे किमान ४० टक्के अपंगत्व/ दिव्यांगत्व असल्याचे प्रमाणपत्र आणि UDID कार्ड अनिवार्य.
१३. दिव्यांग पाल्याचे आई -वडील असल्यास पाल्य दिव्यांग असल्याचे आपल्या पाल्याचे जिल्हा शल्य चिकित्सकाचे किमान ४० टक्के दिव्यांगत्व असल्याचे UDID कार्ड आवश्यक.
१४. अर्जदारांने अनाथाचे आरक्षण अर्ज सादर केला असल्यास संबधित कागदपत्र आवश्यक.
१५. आजी / माजी सैनिक स्वतः / पत्नी / मुलगा/अविवाहित मुलगी असल्यास अधिकृत दस्तऐवज.
१६. महिला अर्जदाराने विवाहनंतर नाव बदल केला असल्यास व बदलेल्या नावाने अर्ज केला असल्यास विवाह नोंदणी प्रमाणपत्र व राजपत्र.
१७. विद्यापीठाने गठीत केलेल्या समितीद्वारे अर्जदाराची प्रथम कागदपत्र पडताळणी केली जाईल पात्र अर्जदाराची प्रवेश पूर्व चाचणी घेतली जाईल.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक (YCMOU)	ज्ञानगंगा घरोघरी	YASHWANTRAO CHAVAN MAHARASHTRA OPEN

अंतर्गत संज्ञापन पत्र / Internal Communication Sheet

विभाग : शिक्षणशास्त्र विद्याशाखा अंतर्गत दिव्यांग अध्ययन केंद्र

जा. क्र. : नोंदणी/२०२६ दि : १४.०७.२०२६

प्रवेश पूर्व चाचणीबाबत महत्वाची माहिती

१. अर्जदार कागदपत्र पडताळणी करून पात्र असल्यास त्यांची प्रवेश पूर्व चाचणी घेतली जाईल. ती अनिवार्य असेल.
२. प्रवेश पूर्व चाचणी ही ५० गुणांची असणार आहे. प्रत्येकी २ गुणांचे बहु पर्यायी प्रश्न असे एकूण २५ प्रश्न देण्यात येतील.
३. प्रवेश पूर्व चाचणीसाठी ३० मिनिटांचा कालावधी दिला जाणार आहे.
४. प्रवेश पूर्व चाचणी मध्ये मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषेमध्ये प्रश्न असतील.
५. प्रवेश पूर्व चाचणी न दिल्यास आपल्या गुणांवर परिणाम होऊ शकतो.
६. प्रवेश पूर्व ऑनलाईन चाचणी यशस्वी-रित्या सादर झाल्याचा मेसेज विद्यापीठाच्या संबधित पर्यवेक्षकांना दाखवावा, त्यानंतरच आपल्या उपस्थितीची नोंद घेण्यात येईल.
७. दिव्यांगाना लेखनिकाची व्यवस्था स्वतः करावी. लेखनिक हा विशेष शिक्षण B.Ed. D.Ed पदवीधारक नसावा, याची नोंद घ्यावी. सोबत दिलेल्या प्रपत्र १ कागदपत्र पडताळणी दरम्यान सादर करण्यात यावे.

चाचणी दरम्यानच्या सूचना :

८. कोणतेही **Google Search, Notes, Chat GPT, अथवा इतर व्यक्तींची मदत** घेतल्यास अर्जदार हे अपात्र ठरेल.
९. चाचणी एकदाच सादर करता येईल. **Submit केल्यानंतर पुन्हा ती लिंक परत उघडता येणार नाही.**
१०. कोणत्याही स्वरुपाचा तांत्रिक अडथळा आल्यास त्वरित संबंधित **पर्यवेक्षकांशी** संपर्क साधावा.

प्रवेश पूर्ण चाचणी ही खालील दिलेल्या घटकांवर घेण्यात येईल. घटकांचा भारांश पुढीलप्रमाणे असेल.

अ.क्र.	विषय (Subject)	प्रश्न संख्या	गुण (Marks)
१.	सामान्य ज्ञान (General Knowledge)	०५	१०
२.	शिक्षक अभियोग्यता (Teaching Aptitude)	१०	२०
३.	शिक्षणक्रम आशय (Curriculum Content)	०५	१०
४.	शैक्षणिक धोरणे, योजना, कायदे (Educational Policies, Schemes, and Acts)	०५	१०
	एकूण	२५	५० गुण

बी. एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम कागदपत्र पडताळणीसाठी पुढील सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे अनिवार्य आहे.

१. बी.एड. विशेष शिक्षण शिक्षणक्रम प्रवेशासाठी कागदपत्र पडताळणी व प्रवेश पूर्व चाचणीसाठी नियोजित दिवशी दिलेल्या वेळापत्रकानुसार विद्यापीठाचे मुख्यालय नाशिक येथे उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

२. कागदपत्र पडताळणी (Document Verification) आणि प्रवेश पूर्व चाचणीस उपस्थित न राहणारे अर्जदार सन २०२६-२९ तुकडीच्या प्रवेश प्रक्रियेतून बाद होतील.

३. कागदपत्र पडताळणी करताना अर्जदारांनी कागदपत्रे पडताळणी समितीला प्रवेश अर्जात भरलेल्या माहितीचे मूळ कागदपत्राची पुरावे सादर करणे बंधनकारक असेल. पुरावे सादर करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. त्यात कोणत्याही स्वरूपाच्या नवीन माहितीची भर घातली जाणार नाही ह्याची सर्व अर्जदारांनी नोंद घ्यावी.

४. कागदपत्र पडताळणी समिती कक्षात फक्त अर्जदारांनाच प्रवेश करता येईल.अर्जदारांशिवाय अन्य नातेवाईकांना पडताळणी कक्षात प्रवेश दिला जाणार नाही.

५. संचालक, दिव्यांग अध्ययन केंद्र (CDS) गरजेनुसार त्यात बदल करू शकतील व तो बदल सर्व अर्जदारांना बंधनकारक असेल.

६. अर्जदारांनी प्रवेश समितीवर कोणत्याही प्रकारचा दबाव, धमकी, जबरदस्ती, मारहाण, अपशब्द वापर, वाद घालणे, दस्तऐवज चोरी, सरकारी कार्यालयात गोंधळ अथवा अनधिकृत जमाव केल्यास भारतीय दंड संहितेनुसार (IPC) कार्यवाहीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

७. प्रवेश प्रक्रिये दरम्यान विद्यापीठाच्या संकेतस्थळालावेळोवेळी भेट देणे गरजेचे आहे.

तसेच संबधित सूचना पाहणे व त्याप्रमाणे कार्यवाही करणे ही जबाबदारी अर्जदारांची राहील. अद्ययावत माहितीसाठी वेळोवेळी विद्यापीठ संकेतस्थळाला भेट देत राहावी व अधिक माहितीसाठी बी.एड. माहितीपुस्तिका वाचावी. विद्यापीठ संकेतस्थळ : **http://ycmou.digitaluniversity.ac**

S Tandale

डॉ.साधना तांदळे
शैक्षणिक संयोजक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा

मार्फत :

PPS 29/11/26

श्री. परेश शिऊरकर
कक्ष अधिकारी

29.11.2025

संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा

प्रपत्र-१

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

लेखनिक (Scribe) नियुक्तीसाठी परवानगी प्रपत्र

लेखनिक वापरण्यासाठी परवानगी अर्ज

भाग – अ : अर्जादारची माहिती

1. **अर्जादारचे नाव :** _____
2. **लॉगीन आयडी :** _____
3. **दिव्यांगत्वाचा प्रकार :** _____
4. **दिव्यांगत्वाचे प्रमाण (% असल्यास) :** _____
5. **UDID क्रमांक / दिव्यांगत्व प्रमाणपत्र क्रमांक :** _____
6. **संपर्क क्रमांक :** _____

अर्जदारचे घोषणापत्र

मी, _____, याप्रमाणे घोषित करतो/करते की,

1. परीक्षेसाठी आवश्यक लेखनिकाची व्यवस्था मी स्वतः केली आहे.
2. माझ्या लेखनिकाने **B.Ed. (विशेष शिक्षण), D.Ed. (विशेष शिक्षण) अथवा विशेष शिक्षणातील कोणतीही पदवी/पदविका प्राप्त केलेली नाही.**
3. अर्जामध्ये दिलेली सर्व माहिती माझ्या माहितीनुसार खरी व अचूक आहे.
4. चुकीची माहिती दिल्याचे आढळल्यास विद्यापीठास माझी लेखनिक परवानगी रद्द करण्याचा तसेच नियमानुसार आवश्यक ती कारवाई करण्याचा अधिकार राहील.

उमेदवाराची स्वाक्षरी : _____

दिनांक : _____

लेखनिकाचे घोषणापत्र

मी, _____, याप्रमाणे घोषित करतो/करते की,

1. मी वरील उमेदवारासाठी लेखनिक म्हणून कार्य करण्यास सहमत आहे.
2. मी **B.Ed. (विशेष शिक्षण), D.Ed. (विशेष शिक्षण) अथवा विशेष शिक्षणातील कोणतीही पदवी/पदविका प्राप्त केलेली नाही.**
3. मी परीक्षेचे सर्व नियम व अटी पाळेन.
4. माझ्याकडून दिलेली माहिती खरी असून ती चुकीची आढळल्यास विद्यापीठाच्या नियमानुसार होणारी कारवाई मला मान्य असेल.

लेखनिकाची स्वाक्षरी : _____

दिनांक : _____

विद्यापीठ कार्यालयासाठी

सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करून वरील उमेदवारास लेखनिक वापरण्याची

☐ परवानगी देण्यात येत आहे.

☐ परवानगी नाकारण्यात येत आहे.

समिती सदस्यांचे नाव आणि स्वाक्षरी :

समिती सदस्यांचे नाव आणि स्वाक्षरी :

प्रवेश प्रक्रिया अध्यक्ष/ संचालक शिक्षणशास्त्र विद्याशाखा :

स्वाक्षरी : _____

दिनांक : _____

कार्यालयाचा शिक्का